Publication: Aplamahanagar
Date: 1/6/2019
Page: 2
Column: 1



# ग्राहक सेवेसाठी १९१२२

**मुंबई** ▸▸ अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड (एईएमएल) या शहरातील सर्वांत मोठ्या खासगी वीजकंपीने ग्राहकसेवेसाठी १९१२२ हा एक्स्लुजिव क्रमांक ठेवला आहे. हा क्रमांक सोपा व लक्षात ठेवण्यास सोयीचा असेल अशा दृष्टीने निश्चित करण्यात आला आहे. मराठी, हिंदी आणि इंग्लिश अशी बहुभाषिक सेवा या क्रमांकावर उपलब्ध आहे. हा ग्राहकसेवा क्रमांक २४x७ उपलब्ध असून मुंबईतील सर्व टेलीकॉम ऑपरेटर्समार्फत त्यावर कॉल करता येईल. ग्राहकांचे संस्थेशी संवाद साधण्याचे मार्ग सुलभ करून एईएमएलने ग्राहकसेवा अनुभव मोठ्या प्रमाणात सुधारला आहे. नवीन ग्राहक सेवा क्रमांक कॉल करणाऱ्याला आयव्हीआरच्या मार्फत आठ सुलभ पर्याय दिले जातात.